# दैनंदिन गुन्हे अहवाल

दिनांक ०२/०३/२०२०

भाग १ ते ५ गुन्हयाबाबत (१)

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | गाडगे नगर, अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप क्र १९८/२०२० कलम ३२३,३२६,३४ भादवि |
| फिर्यादि | आकाश विलासराव गायकवाड वय २६ वर्ष, रा. नवसारी सरकारी संडास जवळ अमरावती |
| घटनास्थळ | फि.चे घरासमोर नवसारी शासकीय शौचालयजवळ अमरावती |
| घटना ता. वेळ | ०१/०३/२०२० चे २०-३० वा |
| दाखल ता. वेळ | ०२/०३/२०२० चे ००-२७ वा |
| आरोपी | १) आकाश शेवणे, २) प्रविण गावंडे सोबत दोन इसम नाव माहिती नाही |
| गुन्ह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व आरोपी हे एकाच गावातील असुन १५ दिवसापुर्वी प्रविण गावंडे याचा भाऊ संजय गावंडे याने फिर्यादीच्या गाडीला कट मारल्याने त्यांच्यात वाद झाला होता. यातील आरोपीसोबत दोन इसम यांनी फिर्यादीच्या घरासमोर येवुन तुम्ही काय करता असे म्हणुन फिर्यादीच्या पायावर, हातावर, डोक्याला लोखंडी रॉडने मारहान केली. आकाशने लोखंडी रॉडने ,प्रविण गावंडे ने काठीने तसेच दोन इसमांनी फिर्यादीस लाथाबुक्यांनी मारहान केल्याचे बयाण दिल्याने मेडीकल सर्टीफिकेटवरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पोउपनि गणेश अहीरे पोस्टे गाडगे नगर अमरावती |

२.

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | राजापेठ |
| अप क्र. व कलम | अप.न. १२८/२०२० कलम ३८०,४६१ भादवी |
| फिर्यादि | जिवन यशवंतराव चतुरकर वय ५३ वर्ष रा. अंबा विहार अमरावती |
| घटनास्थळ | रवीनगर अमरावती |
| घटना ता. वेळ | दि. ०१/३/२०२० चे २२/३० वा ते ०२/३/२०२० चे ०७/०० वा दरम्यान |
| दाखल ता. वेळ. | दि. ०२/३/२०२० चे १४/०१ वा |
| आरोपी | अज्ञात |
| गुन्ह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अश्या प्रकारेआहे की, नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी फिर्यादी हे आपले पानटपरी बंद करुन रात्री १०/३० वा घरी गेले व त्यांना सकाळी गजानन वानखडे यांनी त्यांचा पानठेला फुटल्याचे सांगीतले वरुन लगेच पानठेला जवळ गेलो असता पानटेल्या मधील सिगारेट,बँटरी चिल्लर पैसे चोरी गेल्याचे दिसुन आले तसेच त्यांचे समोरील रोडवर दिवाकर झीबल पेंदोर यांचा कृष्णार्पण चौकातील पानठेला व बिट्टु ठाकुर , दिपक प्रल्हाद फांदे रा. साईनगर यांचा आकोली रोड वरील शिवाजी चौक येथील पानठेला फोडुन ६००० रु चा माल तसेच सुनील मधुकर काळे रा. गोपालनगर यांचा ,सातुर्णा येथील पानठेला विशाल शाम ठाकुर या दोघांचा पानठेला फोडण्याचा प्रयत्न केला अश्या प्रकारे कोणीतरी अज्ञात चोराने एकुण १७,३०० रु चा माल चोरुन नेला आहे .अश्या फि.चे जबानी रि.वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अमलदार | ASI अरुण इंगळे ब.न. ५६३ |

३.

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | फ्रेजरपुरा अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप क्र. २२८/२०२० कलम २९४ , ५०६ (ब ) भादवी |
| फिर्यादि | विनोद रमेशराव माहोरे वय ३९ वर्ष, रा. प्रभु कॉलनी महादेवखोरी रोड अमरावती |
| आरोपी | १.मोतीराम सुन्डे व त्यांचे मुले , २) कमलेश सुन्डे, ३) दिनेश सुन्डे, ४) योगेश सुन्डे सर्व रा. प्रभु कॉलनी महादेवखोरी रोड अमरावती |
| घटनास्थळ | प्रभु कॉलनी महादेवखोरी रोड अमरावती |
| घटणा ता. वेळ | दि. ०२/०३/२०२० चे ०७.०० वा दरम्यान |
| दाखल ता. वेळ | दि. ०२/०३/२०२० चे १०.५० वा. |
| गुह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे कि, नमुद घ.ता.वेळी व ठीकानी यातील फिर्यादी यांचे घराच्या कंपाऊंड मध्ये कोणीतरी अज्ञात व्यक्तीने मानवी विष्ठा फेकल्याचे दिसल्यावरुन फिर्यादीने सदर बाबीची विचारपुस केली असता यातील आरोपीतांनी फिर्यादी सोबत वाद घालुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवानिशी मारण्याची धमकी देवुन फसविण्याचे बोलुन दाखविले अशा फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |
| तपासी अधिकारी | स.पो.नि. कानपुरे पो.स्टे. फ्रेजरपुरा अम. शहर |

४.

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | फ्रेजरपुरा अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप क्र. २२९/२०२० कलम ४९८ (अ),३२३,३४ भादवी |
| फिर्यादि | एक महिला |
| आरोपी | १.तुषार रामदास डोंगरे २) रामदास फकिरजी डोंगरे दोन्ही रा. निर्मल टाऊनशिप तीसरा मजला फ्लँट नं. १० काळे पडळ रोड हडपसर पुणे (अमर कॉलनी अमरावती ) व दोन महिला |
| घटनास्थळ | निर्मल टाऊनशिप तीसरा मजला फ्लँट नं. १० काळे पडळ रोड हडपसर पुणे /अमर कॉलनी अमरावती |
| घटणा ता. वेळ | दि. ०१/०६/२०१९ चे १६.०० वा. ते दि. ०२/०६/२०१९ चे १५.०० वा. दरम्यान |
| दाखल ता. वेळ | दि. ०२/०३/२०२० चे १५.२१ वा. |
| गुह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे कि, यातील आरोपी हे फिर्यादिचे नातेवाईक असुन आरोपी क्र. १ ते ४ यांनी फिर्यादीस लग्न झाले पासुन हुन्ड्या साठी व घरुन किमती वस्तु आणण्या करिता शारीरीक व मानसीक त्रास देवुन मारहान केली आहे. नमुद घ. ता.वेळी व ठीकानी यातील आरोपीतांनी फिर्यादीस माहेर वरुन १० लाख रु. घेवुन ये असे म्हणुन तगादा लावला त्यावर फिर्यादीने नकार दिला असता आरोपी क्र. १ ते ३ यांनी मारहान केली आहे. अशी तक्रार पो.स्टे. ला दिल्याने सदरचे प्रकरण कौटुंबिक सलाह करिता महीला सहायक कक्ष अम. शहर येथे पाठविण्यात आले. सदर ठीकानी प्रकरण पडताळणी वरुन महीला सहायक कक्ष येथुन जा.क्र./मसक/कार्यवाही/२४०/२०२० कार्यालय पोलीस आयुक्त अम. शहर दि. २७/०२/२०२० अन्वये लेखी आदेश यातील आरोपीतान विरुद्ध गुन्हा दाखल करण्याचा प्राप्त झाल्याने मे.पो.नि.सा. आदेशाने सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |
| तपासी अधिकारी | स.पो. उप नि. अरुण मेश्राम ब.नं. ५८६ पो.स्टे. फ्रेजरपुरा अम. शहर |

५.

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पोलीस स्टेशन खोलापुरी गेट, अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | ५९/२०२० कलम ५०६(ब), ५०४ भा.द.वी. सह कलम ४, २५ आर्म अँक्ट |
| फिर्यादि | समीर हुसेन नजीर हुसेन वय ३५ वर्ष रा. साबनपुरा अमरावती |
| आरोपी | मुजम्मील हुसेन जाकीर हुसेन वय २५ वर्ष रा. साबनपुरा अमरावती |
| घटनास्थळ | साबनपुरा अमरावती |
| घटना ता. वेळ | ०१/०३/२०२० चे २२-३० वा. |
| दाखल ता. वेळ | ०२/०३/२०२० चे ०१-०१ वा. |
| हकीकत | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी व आरोपी हे काका पुतण्या असुन आरोपी हा दारु पिण्याचे सवईचा असुन तो मोहल्ल्यात नेहमी त्रास देतो. नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी हा घरी जेवण करीत असतांना यातील आरोपी हा दारु पिवुन आला व त्याच्या आईला शिवीगाळ करीत होता. व फिर्यादीला सुध्दा शिवीगाळ केली व त्याने पुर्वी रिपोर्ट दिला होता म्हणुन त्यास चाकुने जिवानीशी मारतो असे म्हणुन फिर्यादीचे अंगावर चाकु घेवुन धावला त्यामुळे फिर्यादी तेथुन पळत पो. स्टे. ला रिपोर्ट देण्यास आला असता पोलीस घटनास्थळी गेले तेथे आरोपी हा हातात चाकु घेवुन मिळुन आला त्यास पंचा समक्ष ताब्यात घेवुन सदरचा चाकु जप्त करण्यात आला अशा जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | ASI राजु जढाळे ब.नं. ५२१ पो. स्टे. खोलापुरीगेट अमरावती |

## जुगार रेड-१

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | गाडगे नगर, अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप.क्र. १९९/२०२० कलम १२(अ) म.जु.का. |
| फिर्यादि | सरतर्फे पो.हे.का. शेखर गणपतराव गेडाम ब.नं. ११२७, पो.स्टे. गाडगेनगर अमरावती शहर |
| घटनास्थळ | संत गुलाबबाबा नगर अमरावती |
| घटना ता. वेळ | ०२/०३/२०२० चे १३-३० वा |
| दाखल ता. वेळ | ०२/०३/२०२० चे १५-२२ वा |
| आरोपी | दिपक देवेंद्र चौधरी वय २२ वर्ष रा. रमाबाई आंबेडकर नगर अमरावती |
| गुन्ह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे नमुद आरोपीवर जुगार रेड केली असता त्याचे ताब्यातुन १ ते १० वरली आकडे लिहलेल्या ४ चिठ्ठ्या , नगदी ६०० रू. एक डॉट पेन कि.अं. ५ रू. असा एकुण ६०५ रू. चा माल मिळुन आल्याने पंचासमक्ष आरोपीस ताब्यात घेतले. आरोपीचे कृत्य कलम १२(अ) म.जु.का.प्रमाणे होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | मसपोनि खांडेकर. पोस्टे गाडगे नगर अमरावती |

## अकस्मात मृत्यु (१)

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | खोलापुरी गेट अमरावती |
| मर्ग क्र. व कलम | ६/२०२० कलम १७४ जा. फौ. |
| फिर्यादी | गितेश रघुनाथराव पारीसे वय ३८ वर्ष रा. न्यु हनुमान नगर व्ही. एम. व्ही. मागे अमरावती |
| मृतकाचे नाव व पत्ता | रघुनाथ फकिरजी पारीसे वय ६५ वर्ष रा. आकोली अमरावती |
| घटनास्थळ | आकोली अमरावती |
| घटना ता. वेळ | ०१/०३/२०२० चे २२-३० वा. |
| दाखल ता. वेळ | ०२/०३/२०२० चे ०९-३६ वा. |
| मरणाचे कारण | गळफास घेवुन |
| गुह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद फिर्यादी याने पो. स्टे. ला येवुन रिपोर्ट दिला की, त्याचे वडील रघुनाथ पारीसे यांनी फिर्यादीचे आईचे मृत्यु नंतर दिड वर्षा अगोदर एका महिले सोबत केले होते तिला अगोदरचे घरची एक मुलगी आहे ते दोघे लहान मुलीसह आकोली येथे घर बांधुन राहत होते. दि. १/३/२०२० रोजी रात्री १०-३० वा. दरम्यान फिर्यादीचा चुलत भाऊ दर्शन प्रल्हाद पारीसे रा. गुणवंतवाडी अमरावती याला फिर्यादीचे वडीलांचा फोन आला व त्यांनी म्हटले की, मी उद्या तुम्हाला दिसनार नाही असे म्हटल्यावर त्याने फिर्यादीस फोन लावला व घरी येतो असे म्हटले व काही वेळाने फिर्यादीचे चुलत भाऊ दर्शन व सुरज व फिर्यादी हे मोटर सायकलने आकोली येथे आले असता त्यांना घराचे दरवाजे उघडे दिसले आत जावुन पाहीले असता फिर्यादीचे वडील सिलींग पंख्याला वायर व दुपट्टा बांधुन दुपट्ट्याने गळयाला फास घेतल्याचे दिसले दुपट्ट्याची गाठ सोडुन त्यांना पलंगावर ठेवले असता त्यांचे शरीर थंड पडले होते. नंतर पोलीसांना फोन केला व पोलीस आल्यानंतर त्यांना ईर्विन दवाखाना येथे नेले असता डॉ. सा. यांनी मृत घोषीत केले अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपसात घेतला. |
| तपासी अधिकारी | ASI राजु जढाळे ब.नं. ५२१ पो. स्टे. खोलापुरीगेट अमरावती |